**संंत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

नॅकच्या प्रक्रियेत मुल्यांकनकर्त्यांची महत्वपूर्ण भुमिका - कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात नॅकची राष्ट्रीय मुल्यांकनकर्ता प्रशिक्षण कार्यशाळा

अमरावती.

विद्यार्थ्यांना दर्जेदार उच्च शिक्षण मिळावे म्हणून महाविद्यालयांना नॅक बंधनकारक आहे. महाविद्यालयांचे नॅक होत असताना या प्रक्रियेत मुल्यांकनकर्त्यांची भुमिका अत्यंत महत्वाची असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. राष्ट्रीय मुल्यांकन तथा प्रत्यायन परिषद (नॅक) आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात मुल्यांकनर्त्यांकरिता अभिमुखता प्रशिक्षण कार्यशाळा नुकतीच पार पडली. नॅकच्या राष्ट्रीय मुल्यांकनकर्ता प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर मार्गदर्शन करताना बोलत होते.

सिनेट सभागृहात झालेल्या उद्‌्घाटन कार्यक्रमाप्रसंगी मंचावर कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, मुल्यांकन व प्रत्यायन परिषदेचे (नॅक) उपसल्लागार डॉ. गणेश हेगडे, उपसल्लागार डॉ. देवेंदर कवडे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विलास सपकाळ उपस्थित होते.

मुल्यांकनकर्त्यांना मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर पुढे म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रात महत्वपूर्ण बदल होत आहे. या बदलाबाबत या कार्यशाळेत विविध विषयांवर आपण चर्चा करणार आहोत. या कार्यशाळेत मुल्यांकनकर्त्यांना नॅकचे मुल्यांकन आणि प्रत्यायन करण्याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळणार असून मुल्यांकनकर्त्यास पीअर टीममध्ये सहभागी होत नॅककरिता विविध महाविद्यालय, शैक्षणिक संस्थांचे मुल्यांकन कसे करावे, यासाठी उपयुक्त ठरणार आहे. परीक्षेतील मुल्यांकन आणि महाविद्यालयांचे शैक्षणिक मुल्यांकन यामध्ये बराच फरक आहे, याची जाणिव मुल्यांकनकर्त्यांना ठेवावी लागणार आहे. मुल्यांकन करीत महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी मुल्यांकनकर्त्यांना प्रयत्न करावे लागणार असून नॅकच्या पीअर टीममध्ये सहभागी होत असताना शैक्षणिक मुल्यांकन समजून घ्यावे लागणार अाहे.

शैक्षणिक क्षेत्रात होत असलेल्या वेगवान बदलाकडे लक्ष देण्याची गरज आहे. आता शिक्षणाचे मापदंड पूर्णपणे बदलले आहे. संस्कारासोबतच रोजगाराच्या दृष्टिने शिक्षण क्षेत्राकडे पाहिल्या जात आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून शैक्षणिक संस्थांचे मुल्यांकन गरजेचे असल्याचे कुलगुरू म्हणाले. देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा २० विद्यापीठे होती, आता देशात ९०० च्या आसपास विद्यापीठे तर ४० हजार महाविद्यालये आहेत. सोबत शैक्षणिक क्षेत्र प्रगल्भ झाले असून परिणाम आधारित शिक्षण देण्याची शैक्षणिक संस्थांची जबाबदारी देखील वाढली आहे. महाविद्यालय, संस्था व विद्यापीठांमध्ये किती विद्यार्थ्यांनी नोंदणी केली हे महत्वाचे नाही तर, शिक्षणातून किती विद्यार्थी सबळ झाले आणि रोजगारक्षम झाले याची तपासणी मूल्याकंनकर्त्यांना करावी लागणार असल्याचे कुलगुरू डॉ. चांदेकर म्हणाले.

शैक्षणिक मुल्यांकन करणारी नॅक ही सर्वोत्तम संस्था असल्याचे या कार्यशाळेत घेतलेल्या प्रशिक्षणाला शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांचे मुल्यांकन करताना योग्य न्याय देण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. चांदेकर यांनी याप्रसंगी केले. तत्पूर्वी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्रयापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनी मुल्यांकनाच्या रणनितीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. नॅकचे उपसल्लागार डॉ. गणेश हेगडे यांनी मुल्यांकनकर्ता अभिमुखता कार्यक्रमाबाबत माहिती दिली. मुल्यांकन करणाऱ्याच्या दृष्टिकोनातून उच्च शिक्षणातील हमी या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर झालेल्या पहिल्या सत्रात रिवाईज अक्रिडीएशन फ्रेमवर्क - ऑन ओव्हर व्ह्यू या विषयावर नॅकचे उपसल्लागार डॉ. गणेश हेगडे यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात नॅकचे साहाय्यक सल्लागार डॉ. डी.के. कांबळे, नॅकचे उपसल्लागार गणेश हेगडे यांनी डीव्हीव्ही, एसएसएस, आयसीटी, इंटेग्रेशन आरएएफ ऑनलाइन रजिट्रेशन ऑफ असेसर याबाबत माहिती दिली. आयक्युएसीचे संचालक डॉ. एस. एफ. आर. खाद्री यांनी आभार मानले. कार्यक्रमाला मा. कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, अधिष्ठाता डॉ. एफ. सी. रघुवंशी, अधिष्ठाता डॉ. अविनाश मोहरील यांचेसह विविध विभागांचे शिक्षक व अधिकारी उपस्थित होते. विविध सत्रांच्या आयोजनाची जबाबदारी डॉ. व्ही. एन. नाठार, डॉ. जागृती ढोरे, डॉ. मनिषा कोडापे, डॉ. नितीन फिरके यांनी जबाबदारी सांभाळली.

**पाच राज्यातून ६ संशोधन व्यक्तींसह ५२ प्रतिनिधींचा सहभाग**

नॅकच्या मुल्यांकनकर्ता अभिमुखता प्रशिक्षण कार्यशाळेला पाच राज्यातील प्रतिनिधी सहभागी झाले होते. संशोधन व्यक्ती म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, नॅकचे उपसल्लागार डॉ. गणेश हेगडे, नॅकचे उपसल्लागार डॉ. देवेंदर कवडे, विद्यापीठ केमिकल टेक विभाग प्रमुख डॉ. विलास सपकाळ, नॅकचे साहाय्यक सल्लागार डॉ. डी. के. कांबळे व विद्यापीठ भूगर्भशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस.आर.एफ. खाद्री यांचा समावेश होता. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गोवा, गुजरात आणि कर्नाटक राज्यातून तब्बल ५२ प्रतिनिधी या कार्यशाळेला उपस्थित होते.

**तीन विद्यापीठातील कुलगुरूंचा सहभाग**

नॅकच्या मुल्यांकनकर्ता अभिमुखता कार्यशाळेत विविध विद्यापीठातील तीन कुलगुरूंचा देखील सहभाग होता. गुजरातच्या भावनगर येथील महाराजा क्रिष्णकुमारसिंहजी भावनगर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. महिपतसिंह छावडा, गुजरात गांधी नगर येथील गुजरात राष्ट्रीय विधी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. शांताकुमार, राजकोट येथील क्रांतीगुरू श्यामजी कृष्ण वर्मा कच्छ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सी.बी. जडेजा यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

---

प्रति, जनसंपर्क विभाग

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. 21/11/2019.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती

आपला,

जनसंपर्क अधिकारी